# मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, उदगीर यांचे न्यायालयात

(न्यायालय क्र.२)

## गुन्हयाचा तपशील

**सं.फौ.ख. क्र. ५७०/२०२३**

**नि.क्र.**

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | – २८/०४/२०२३ |
| २. | तक्रारकर्ता | – **विनायक पांडूरंग बेंबडे**<br>रा. इस्लामपूर, ता.उदगीर, जि.लातूर. |
| ३. | आरोपीचे नाव | – **राहुल देविदासराव पाटील**<br>वय– ४० वर्षे, धंदा– शेती,<br>रा. इस्लामपूर, ता. उदगीर, जि. लातूर. |

**४. अपराधाचा तपशील –**

तुम्ही फिर्यादीस कायदेशीर देणे असलेल्या रकमेच्या परतफेडीकरिता तुमचे खाते असलेल्या एच.डी.एफ.सी. बँक, शाखा उदगीर या बँकेचा दि.०५/०१/२०२३ रोजीचा रक्कम रूपये ८०,०००/– चा धनादेश क्र.००००१४ हा फिर्यादीस दिला. सदरचा धनादेश वटणेकरिता फिर्यादीने त्याचे खाते असलेल्या महेश अर्बन को–आप. बँक अहमदपूर, शाखा उदगीर या बँकेत दिनांक ०३/०४/२०२३ रोजी जमा केला असता सदर धनादेश दिनांक ०४/०४/२०२३ रोजी ''फंड्स इनसफिशियंट'' या शेऱ्यासह नाकारला गेला व मेमोसह फिर्यादीस परत मिळाला. त्यानंतर फिर्यादीने दिनांक११/०४/२०२३ रोजी तुम्हास वकिलामार्फत रजिस्टर पोस्टाने धनादेशाच्या रकमेची मागणी नोटीस पाठविली. ती नोटीस तुम्हास मिळूनही तुम्ही विहित मुदतीत फिर्यादीच्या मागणीप्रमाणे धनादेशाची रक्कम फिर्यादीस अदा केली नाही व त्याद्वारे तुम्ही भारतीय चलनक्षम दस्तऐवज कायदा, १८८१ च्या कलम १३८ अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केलेला आहे.

**५. आरोपीची जबानी –**

प्रश्न १ तुम्हाला प्रकरणाच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर होय.

प्रश्न २ तुम्हाला अपराधाचा तपशील समजला काय ?

उत्तर होय.

प्रश्न ३ तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर नाही.

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2025.09.29 16:52:34 +0530

(के. ए. यादव)

...................................

आरोपीची सही/अंगठा २ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

दि. २९/०९/२०२५ उदगीर

**प्रमाणपत्र**

वर नमुद केलेला तपशील आरोपींना वाचुन दाखविण्यात आला. मराठीमध्ये समजावून सांगण्यात आला व वर नमुद केलेला गुन्हा त्यांनी कबुल नसल्याचे सांगितले आहे.

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2025.09.29 16:52:38 +0530

(के. ए. यादव)

२ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

दि. २९/०९/२०२५ उदगीर